Jagdamba Education Society's

# Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
**At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401**

Accredited by

NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 02/10/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या शहराच्या, आतल्या शहराच्या…
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष



## विचारवंत, प्राध्यापक गं. बा. सरदार

गंगाधर बाळकृष्ण सरदार तथा गं. बा. सरदार हे एक मराठी लेखक, समाजमनस्क विचारवंत आणि प्राध्यापक होते. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १९०८ रोजी पालघर जिल्ह्यात जव्हार येथे झाला. त्यांनी जव्हार, मुंबई आणि पुणे येथे एम.ए.पर्यंत शिक्षण घेतले. इ.स. १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहात यांनी सहभाग घेतला. गांधीजींच्या विधायक चळवळीद्वारा स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय होते. तथापि राजकारणात न राहता स्वत:स महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळी व चळवळीच्या माध्यमातून सामाजिक प्रक्रियेत वाहून घेतले. ते श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख होते आणि त्यांचे कार्य अर्वाचीन महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाचे मानले जाते.

सरदारांचे एकूण २० ग्रंथ प्रकाशित झाले असन त्यांच्या वैचारिक समाज प्रबोधनात्मक व संत वाङ्मयविषयक ग्रंथांनी महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात एक योग्य दिशा दाखवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, संत साहित्याची सामाजिक आणि राष्ट्रीय कामगिरी, अर्वाचीन मराठी ग्रंथाची पूर्वपीठिका, रामदास दर्शन, महाराष्ट्र जीवन, महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी, गांधी आणि आंबेडकर हे सरदारांनी लिहिलेल्या ग्रंथांपैकी काही प्रसिद्ध ग्रंथ आहेत. १९८० च्या बार्शी येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या ५४ व्या अधिवेशनाचे हे अध्यक्ष होते. १९८१ मध्ये प्रवरानगर येथे झालेल्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे हे अध्यक्ष होते. १९८२ मध्ये भटक्या व विमुक्त जाती संघटनेच्या पिंपरी येथील अधिवेशनाचेदेखील हे अध्यक्ष होते. गंगाधर सरदार यांचे १ डिसेंबर १९८८ रोजी निधन झाले

Nashik Edition
Oct 02, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

| | |
|---|---|
| LIBRARIAN | PRINCIPAL |
| MR.U.D. MULANI | PROF.U.B JADHAV |
| SND POLYTECHNIC | SND POLYTECHNIC |
| YEOLA-423401 | YEOLA-423401 |